**परिपत्रक क्रमांक 275 दिनांक 3/12/1991**

**विषय :- 1951 चे अधिनियमाचे नियम 42 (2) प्रमाणे हरकतीची जादा भरलेली अंशदान रक्कम परत करणेबद्दल**

**धर्मादाय** संघटनेच्या सर्व विभागीय व उप विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, शासनाच्या विधी व न्याय विभाग पत्र क्रमांक बीपीटी/1184/61/(128)-सहा दिनांक 12/8/1985 च्या आदेशानुसार या कार्यालयाचे परिपत्रक क्र. 251 नुसार सर्व विभागीय व उप विभागीय कार्यालयांना जादा भरलेली अंशदानाची रक्कम परत न करता पुढील वर्षाच्या अंशदानाच्या रकमेत ती हिशेबात घ्यावयाची असल्यामुळे व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाच्या कलम 60 प्रमाणे आणि नियम 32(6ब) अशी बेकायदेशीर असल्याने अशी रककम परत करणे ताबडतोब थांबवावे असे कळविले होते.

परंतू आता शासनाने मुंबई सार्वजनिक विश्वस्त नियमाच्या नियम 32 च्या पोटनियम 6 मध्ये सुधारणा केली असून नियम 33 च्या पोटनियम 7 नंतर पोटनियम (8) अंतर्भूत केला आहे. त्या पोटनियमामुळे आता धर्मादाय आयुक्त,धर्मादाय उप आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त यांना एखाद्या वर्षी अंशदानाची जादा रक्कम भरली गेली तर पोटनियम 8 मध्ये निर्देश केलेल्या अटींना अधीन राहून अशी जादा रककम न्यासांना परत करता येईल्. सदर अधिनियमाची प्रत या परिपत्रासोबत पाठविण्यात येत आहे व कळविण्ंयात येत आहे की, विश्वस्तांनी दाखल केलेल्या हरकत अर्जानंतर किंवा स्वयंखुद्द चौकशीत एखाद्या न्यासाने अंशदानाची रककम जादा भरलेली आहे, असे आढळून आहे व नियम 33 च्या पोटनियम 8 मधील तरतूदीप्रमाणे सदर जादा रक्कम समायोजित करणे शकय नसेल तर अशी जादा रककम न्यासाला परत करण्यांत यावी.

सोबत :- वरील प्रमाणे.

क.मो.देसाई
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

दिनांक :- 3/12/1991
प्रति,

1. धर्मादाय सह आयुक्त,
   पुणे/नागपूर//औरंगाबाद

2. धर्मादाय उप आयुक्त,
   बृहन्मुंबई/कोल्हापूर/सोलापूर/भंडारा

3. सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
   रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/रायगड/जालना/जळगांव/धुळे/अमरा
   वती/यवतमाळ/
   नाशिक /अहमदनगर/अकोला/बुलढाणा/चंद्रपूर/वर्धा/गडचिरोली/परभणी/
   नांदेड/सांगली/सातारा/लातर/उस्मानाबाद/बीड.